## हो चाळिशीची चळत

ही चाळिशीची चळत
श्वासा-निःश्वासाचा वायुस्तंभ
मारुतीचं पुच्छासन

कितीदातरी कात टाकून
सतत नव्या होत राहाणाऱ्या
कातडीच्या पोतडीत
दात वापरायचं विसरलेला
हा साप

हे भुयार न संपणारं
चक्रवर्ती अपरिचिताचं कंदर
हा मध्य सरोवराचा
अन् हे आदिल ंदिवर
मधोमध फुललेलं.

हा तराजू मतीच्या मितीवर
तोललेला आटोकाट
निःस्पृहतेचा बाण स्वतःवरच रोखून
निःस्पृहता कशी करणार प्रुव्ह?

ही कळ
हा कळीचा प्रश्न
तो कळीचा नारद तिकडं
अफवा-कंड्या पसरवणारा
चरित्र कुरतडणारा उंदीर

ही अमोलिक गिरवागिरव
इंदिवर मिटल्यावरची
निरवानिरव

© गणेश विसपुते